Exh. 11

क्रि.कि.अर्ज नं. १/२०२६

मे.ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट वर्ग १, जयसिंगपूर यांचे कोर्टात

श्री.अजय अनिल कांबळे ) अर्जदार

विरूध्द

श्री.दिपक बाळू मोरे ) वि.प.

अर्ज- बी.एन.एस.एस.कलम ९४
अन्वये

Order -
other side to say

Digitally signed by PATIL MAYUR SAMPAT
PATIL MAYUR SAMPAT Date: 2026.02.09 15:14:38 +0530

यातील अर्जदार मे.कोर्टास कळवतात ते खालीलप्रमाणे-

१. यातील अर्जदार यांनी या मे.कोर्टात बी.एन.एस.एस. कलम १०० अन्वये अर्ज केलेला आहे. प्रस्तुत अर्जाचे कामी मे.कोर्टानी यातील वि.प. नं.१ व २ यांना रितसर नोटीसा काढलेल्या आहेत. सदर नोटीसीची बजावणी झालेनंतर यातील वि.प. हे प्रस्तुत कामी त्यांचे वकिलांचे मार्फत हजर होवून त्यांनी म्हणणे सुध्दा दिलेले आहे.

Assistant Superintendent

२. वि.प. नं.२ यांनी अर्जदार यांचे बरोबर दि.४/१/२०२४ रोजी राजर्षी शाहु जिवन विकास चॅरिटेबल ट्रस्ट, कोल्हापूर येथे हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे व रितीरिवाजाप्रमाणे विवाह केलेला आहे. तेंव्हा पासून वि.प. नं.१ या पत्नी या नात्याने अर्जदार यांचे बरोबर राहत होत्या.

३. दि.४/१/२०२४ रोजी अर्जदार व वि.प. नं.१ यांनी घरातील लोकांच्या इच्छे विरूध्द प्रेम विवाह केला असल्यामुळे वि.प.नं.२ यांना त्यांच्या घरातील लोकांचेकडून व समाजातील कांही लोकांचेकडून जिवीतास धोका निर्माण होण्याची शक्यता होती, म्हणून दि.४/१/२०२४ रोजी अर्जदार व वि.प.नं.२ यांनी विवाह झालेनंतर त्याच दिवशी संध्याकाळी ५ वाजता शिरोळ पोलीस ठाणेमध्ये जावून संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांना विवाहाची कल्पना दिली व योग्य ती सर्व कागदपत्रे पोलीसांना दाखवली. तद्नंतर त्या दिवशी म्हणजेच दि.४/१/२०२४ रोजी संबंधीत पोलीस अधिकारी, श्री.भोजणे साहेब यांनी अर्जदार व वि.प. नं.२ यांचा लेखी जबाब नोंदवून घेतला. सदरचा जबाब नोंदवितेवेळी वि.प. नं.२ यांचे घरातील सर्व लोक हजर होते. वि.प. नं.२ यांचा जबाब नोंदवताना वि.प. नं.२ यांनी पोलीस स्टेशनमध्ये अर्जदार हे माझे पती असून मी त्यांच्या बरोबर माझ्या इच्छेनुसार स्वखुशीने विवाह केलेला आहे व मी त्यांच्या बरोबरच संसार करणेसाठी जाणार आहे व त्यांना आयुष्यभर साथ देणार आहे अशा प्रकारचा जबाब दिलेला आहे. सदरचा जबाब पोलीसांनी लिहून घेतल्यानंतर संबंधीत

Assistant Superintendent

पोलीस अधिकाऱ्यांनी पोलीस स्टेशन मधील उपलब्ध असलेल्या रजिस्टरला अर्जदार व वि.प. नं.२ यांच्या सहया सुध्दा घेतलेल्या आहेत. अर्जदार व वि.प. नं.२ यांचे घेतलेले जबाब सद्या शिरोळ पोलीस स्टेशनमध्ये आहे. सदरचे जबाब मे.कोर्टा समोर आलेनंतर संपूर्ण खरी वस्तुस्थिती मे.कोर्टास समोर येणार आहे. त्यामुळे न्यायदानास मदत होणार आहे.

४. करिता मे.कोर्टास विनंती की,

अ) दि.४/१/२०२४ रोजी अर्जदार व वि.प. नं.२ यांचे घेतलेले संबंधीत शिरोळ पोलीस स्टेशनचे अधिकारी श्री.भोजणे साहेब यांना मे.कोर्टात दाखल करणेस योग्य ते आदेश करणेत यावेत.

ब) जरूर तर अर्ज दुरूस्तीस परवानगी असावी.

क) इतर अनुषंगीक दाद याचकामी अर्जदारवतीने देववावी.

येणेप्रमाणे अर्ज असे.

ता. ०९/०२/२०२६

प्रतिज्ञा

मी यातील अर्जदार श्री.अजय अनिल कांबळे, व.व.२७, धंदा- वैद्यकीय, रा.हरोली, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर अशी प्रतिज्ञा करतो की, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा असे.

ता.०९/०२/२०२६

Assistant Superintendent

## ॲफिडेव्हीट

मी यातील अर्जदार श्री.अजय अनिल कांबळे, व.व.२५, धंदा- वैद्यकीय, रा.हरोली, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर ॲफि डेव्हीट करतो की, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट आज मु.जयसिंगपूर.

ता. ०९ /०२/२०२६

मी ॲफिडेव्हीट करणारेस ओळखतो.

(ॲडव्होकेट)

Adv. B. I. Kamble.

## प्रतिज्ञा

मी यातील अर्जदार श्री.अजय अनिल कांबळे, व.व.२५, धंदा- वैद्यकीय, रा.हरोली, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर अशी प्रतिज्ञा करतो की, वरील अर्जातील व ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा असे.

ता. ०९ /०२/२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri. Ajay Anil Kamble Age 25
of. Haroli, Tal Shirol, Dist Kolhapur
identified by Shri. Adv. B. I Kamble
............whom I know personally
Dated :- 09/02/2026

Assistant Superintendent Jaysingpur